अस्सल सोलापुरी
# सुराज्य सोलापूर
। मंगळवार, दि. ६ ऑगस्ट २०२४ ।
पान : ३

## खंडाळी येथे मोटारीच्या धडकेने दुचाकी चालक ठार

**मोहोळ** : वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेन दुचाकीवरील ३७ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मरण पावले . हा अपघात सोलापूर ते पुणे महामार्गावरील खंडाळी जवळ रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला.


याप्रकरणी अपघातानंतर पसार झालेल्या मोटर चालका विरुद्ध मोहोळच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. कल्याणी मारुती वाघमारे (वय ३७ रा खंडाळी ता.मोहोळ) असे मयताचे नाव आहे.

ते आपल्या दुचाकीवरून शेटफळ करून आपल्या घराकडे निघाले होते त्यावेळी सोलापूरहून पुण्याच्या दिशेने जाणारी एमएच२४-एबी-९५४३ या क्रमांकाची मोटर धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मरण पावले. या अपघाताची नोंद मोहोळ पोलिसात झाली आहे.

### मनसेच्या 'इंजिन'ची शिट्टी घुमली...

### महाराष्ट्र सधन असताना आरक्षणाची गजरच काय?

# मतांसाठी माथी भडकावण्याचे राजकारण : राज ठाकरे



**सोलापूर/प्रतिनिधी**

**खासगी संस्थांमध्ये आरक्षण आहे का? नेमके किती मुलांना आरक्षण मिळणार आहे. हे आपण तपासणार आहोत का? माथी भडकवायची. हे सर्व जे राजकारण सुरू आहे, ते कोणाच्या ना कोणाच्या खांद्यावर बंदूक ठेवून सुरू आहे. मतांसाठी राजकारण सुरू आहे. मुलामुलींच्या विचार करत नाही. हे आपल्याला मूर्ख बनवत आहेत हे प्रत्येक समाजाने समजून घेतले पाहिजे. आपला महाराष्ट्र सधन आणि संपन्न आहे. आपल्याकडे उद्योगधंदे, नोकऱ्या, शिक्षण या सर्व गोष्टी मुबलक प्रमाणात आहेत, त्यामुळे महाराष्ट्रामध्ये आरक्षणाची गरजच नाही, असे विधान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केले आहे.**

पक्षाची आढावा बैठक घेण्यासाठी राज ठाकरे सोमवारी सोलापुरात आले होते, त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. ठाकरे पुढे म्हणाले, मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर या भागात उड्डाणपुले व इतर गोष्टी होत आहेत. त्या महाराष्ट्रातील मूळच्या लोकसंख्येसाठी होत नाहीत. बाहेरून आलेल्या लोकसंख्येसाठी या सोयी सुविधा होत आहेत. बाहेरून आलेल्या लोकांसाठी राज्याचा सर्वाधिक पैसा खर्च होत आहे. ठाणे हा देशातील हा एकमेव जिल्हा जिथे ७-८ महापालिका आहेत. एकाच जिल्ह्यात सात ते आठ महापालिका असतील तर मग इथली लोकसंख्या काय ठाण्यातील लोकांनी वाढवली आहे का? म्हणजे बाहेरून येणाऱ्या लोकांचा लोंढा एवढा मोठा आहे की, त्यांची व्यवस्था लावण्यातच सरकारचा पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे.

ठाकरे पुढे म्हणाले, आपल्याकडे नोकरीच्या संधी निर्माण होत आहेत. पण आपल्याकडच्या तरुणांना माहितीच नसते की नोकऱ्या कुठे निर्माण झाल्या आहेत. बाहेरच्या राज्यातील मुले येतात आणि आपल्या राज्यातील नोकऱ्या बळकवतात. आपल्या राज्यातील शिक्षणसंस्थेत शिक्षण घेतात. सर्व गोष्टी पैशावर येतात. मूळ विषय बाजूला राहतो आणि आपण भरकटतो.

हे भरकटणं नाही तर विष कालवणं आहे. आज लहान मुले जातींवर बोलतात. महाराष्ट्रात असं कधीच नव्हते. बिहार आणि उत्तर प्रदेशातील जातीचे राजकारण आता महाराष्ट्रात आले आहे.

या पत्रकार परिषदेला माजी आमदार बाळा नांदगावकर, बाबू वागस्कर, अविनाश अंभ्यकर दिलीप धोत्रे आदी उपस्थित होते.

### पवारांनी महाराष्ट्राचे मणिपूर करायला हातभार लावू नये

शरद पवार हे महाराष्ट्रात मणिपूरसारखी परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली होती. त्यावर ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात मणिपूरसारखी परिस्थिती निर्माण करायला हातभार लावू नये. महाराष्ट्राचा मणिपूर होणार नाही, याची काळजी त्यांनी घेतली पाहिजे. मात्र, त्यांचे आजपर्यंतचं राजकारण पाहता त्यांना महाराष्ट्राचा मणिपूर झालेला हवाय की नकोय, याबाबत नेमकं काही समजत नाही, अशी टिप्पणी ठाकरे यांनी केली.

### आता लाडका मतदार योजना आणा


विधानसभेला मते मिळावी म्हणून सरकार लाडकी बहीण, लाडका भाऊ अशा योजना आणत आहे. सरकारने आता लाडका मतदार योजना आणावी आणि त्यांच्या खात्यावरही पैसे टाकावेत म्हणजे सर्वच मते त्यांनाच मिळतील अशा मिश्कील टोला राज ठाकरे यांनी सरकारला लगावला.

### पक्षाने विधानसभेसाठी दोन सर्व्हे घेतले

सोलापूर आणि मराठवाडा भागातील आढावा बैठक सुरू आहे. यात प्रत्येक मतदारसंघाबाबत चर्चा होणार आहे. त्यानंतर कोणता मतदारसंघ लढवायचा आणि कोणाला उमेदवारी द्यायची याबाबत चर्चा होणार आहे. आमच्या मनसे पक्षाकडून दोन सर्व्हे घेतले आहेत. त्यात मिळालेल्या अहवालानुसारच पक्ष पुढील पावले टाकत आहे, असे ठाकरे म्हणाले.

# शिंदे घराण्याच्या राजकारणाचं शिजतंय काय? आमदारकीच्या महत्त्वाकांक्षेतून राजकीय संघर्ष अटळ

● राजकीय हाडवैऱ्याच्या गोटात धनराज शिंदे ● शिंदे घराण्याचे राजकारण कोणत्या आड्यावर टेकणार?



**अकलूज : येथील शिवरत्न बंगल्यावर मोहिते-पाटील परिवाराकडून माढ्याच्या धनराज शिंदे यांचे स्वागत करताना खा.धैर्यशिल मोहिते-पाटील.**

- **शिंदे बंधूंच्या भूमिकांबद्दल माढ्यासह जिल्ह्यात औत्सुक्य**
- **मोहिते-पाटील अन् शिंदे घराण्यात दिलजमाईचा अंक?**

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

अकलूजकर मोहिते-पाटील अन् निमगावकर शिंदे यांच्यामध्ये मागच्या काही वर्षातलं विळी-भोपळ्याचं राजकिय हाडवैर. जिल्ह्यावरील वर्चस्वातून या दोघा प्रस्थापित अन् मातब्बर घराण्यांनी एकमेकांना खपविण्याची एकही संधी न सोडलेली. प्रत्येक वेळी कुरघोड्याचं राजकारण केलेलं. एकमेकांना आस्मान दाखविण्याचा प्रत्येक आघाड्यांवर जाणीवपूर्वक घाट घातलेला. याच निमगावकर शिंदे आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यामध्ये काही वेगळं घडतंय अन् शिजतंयसुद्धा..! होय; राजकिय दुष्मनी असलेल्या मोहिते-पाटील यांच्या गोटात आमदार बबनराव शिंदे यांचे पुतणे आणि उद्योजक रमेश शिंदे यांचे सुपुत्र धनराज हे प्रकटले. धनराज यांच्या इथं जाण्यानं माढा तालुक्याचं त्यापेक्षा शिंदे घराण्याचं राजकारण आता कोणत्या आड्यावर टेकणार? मोहिते-पाटील आणि शिंदे यांच्यामधील दिलजमाईचा नवा अंक सुरु होणार का? याबद्दल मोठं औत्सुक्य निर्माण झालं आहे.

आमदार बबनराव शिंदे यांचे बंधू रमेश शिंदे यांचे चिरंजीव माढा वेल्फेअर असोशिएशनचे अध्यक्ष धनराज शिंदे हे माढ्यातून आमदार होण्यासाठी इच्छुक आहेत.तर दुसऱ्या बाजूला आपल्या आमदारकीचा वारस आपले सुपुत्र जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे या करण्यासाठी आमदार बबनराव शिंदे हे प्रयत्नशील आहेत. माढ्याच्या आमदारकीसाठी शिंदे घराण्यातील रणजितसिंह अन् धनराज या दोघा सख्या चुलतभावांची जबरदस्त महत्त्वकांक्षा आहे.

वास्तविक कोणत्या पक्षाकडून लढायचं? हा भाग नंतरचा असला तरी शिंदे घराणं एकसंध राहायचे असेल तर दोघे भावांपैकी कोणाला एकाला माघार घ्यावी लागणार हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. असं असतान शिंदे घराण्यामध्ये वेगळ्या हालचाली दिसताहेत. ज्यावरुन आमदारकीबाबत दोघा भावांची आणि त्यांच्या पित्यांची महत्त्वकांक्षा कायम अन् ठासून असल्याचे लपून राहात नाही. कारण धनराज यांची महत्त्वकांक्षा पूर्ण करण्याच्या पार्श्वभूमीवरच, त्याचे पिता रमेश शिंदे यांनी शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांची दिल्लीत जाऊन भेट घेतली तसेच शरद पवार परिवाराशी संधान साधण्याच्या खटपटी सुरु आहेत.

दरम्यान, हे कळताच आमदार बबनराव शिंदे यांनी पुण्यात थेट शरद पवारांना गाठलं अन् चर्चा केली. तर दुसरींकडे कालच धनराज शिंदे यांनी अकलूजकर मोहिते-पाटील यांच्या गोटात जाऊन तासभर खलबतं केली. वास्तविक ज्या मोहिते-पाटील घराण्याशी राजकीय हाडवैर त्याच घराण्याच्या गोटात धनराज शिंदे हे जाऊन खलबतं करतात? ती साधी किंवा व्यावसायिक गणितं घालणारी कशी असू शकतात? हा अत्यंत 'कळी'चा आणि महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. धनराज शिंदे यांनी अकलूजच्या 'शिवरत्न' बंगल्यावर जाऊन स्नेहभोजन घेत जी खलबतं केली, त्यावर कालपर्यंत एकमेकांचे कट्टर राजकिय दुष्मन असलेल्या शिंदे आणि मोहिते-पाटील यांच्यामधील दिलजमाईचा अंक सुरु झाला आहे का, याबद्दल आता माढ्यासह जिल्ह्यात चर्चा सुरु झाली आहे.

### रमेश शिंदे अन् धनराज शिंदे यांच्या वाढत्या गाठीभेटी

उद्योजक रमेश शिंदे यांनी खासदार सुप्रिया सुळेंची भेट घेतल्यानंतर बारामती अॅग्रो कारखान्याचे चेअरमन राजेंद्र पवार यांनी निमगावला येऊन धनराज शिंदे यांच्या घरी भेट दिली. त्यानंतर आमदार रोहित पवार आणि धनराज शिंदे यांच्या पुणे आणि बारामती येथे गाठीभेटी झाल्या. अशात खुद्द धनराज शिंदे यांनी शिवरत्न बंगल्यावर जाऊन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची भेट घेतली. यावरुन आमदार बबनराव शिंदे यांना बाजूला करुन रमेश शिंदे आणि धनराज शिंदे हे बारामतीकर शरद पवार परिवार आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांच्याशी घरोब्याचे संबंध वाढवित आहेत, हे लपून राहात नाही.

### आमदार संजयमामांची होणार म्हणे मध्यस्थी

शरद पवार आणि सुप्रिया सुळेंनी माढ्याचं मातब्बर शिंदे घराणं फोडण्यासाठी टाकलेला डाव दुसरीकडे धनराज शिंदे यांची मोहित-पाटील परिवाराशी वाढलेली जवळीक. पार पडलेली डिनर डिप्लोमशी, अजित पवार गटाचे खंदे समर्थक आमदार बबनराव शिंदे यांनी शरद पवारांची भेट घेऊन चर्चा करणे हे सगळं बघता शिंदे घराणं एकसंध राहणार का? यावर आता प्रश्नचिन्ह आलं असून कोणत्याही परिस्थितीत शिंदे घराणे फुटू नये, अशी शिंदे समर्थक आणि चाहत्यांची इच्छा आहे. या अनुषंगाने, शिंदे घराण्यात जी आमदारकी लढण्यावरुन धूसफुस सुरु झाली आहे, ज्या कारणावरुन घराणं फुटू शकतं तसं होऊ नये म्हणून आमदार संजयमामा शिंदे यांनी मध्यस्ती करावा असा आग्रह त्यांना करण्यात येणार असल्याचा बोलबाला आहे.

## निमगाव येथे तलवारीने मारहाण

**सोलापूर/प्रतिनिधी**

निमगाव (ता.माढा) येथे तलवार आणि लोखंडी रॉडने केलेल्या मारहाणीत अमोल अतुल मुकळे (वय ३६, रा. निमगाव) हा जखमी झाला. ही घटना रविवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास दारफळ ते निमगाव रोडवरील धुम्मावस्ती जवळ घडली. अज्ञात कारणावरून त्याला शरद मुकळे आणि त्याच्या साथिदाराने मारहाण केली. त्याला माढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## मोहोळ येथे ब्लेडने मारहाण करून जखमी

**सोलापूर** : मोहोळ येथील लोकसेवा हॉटेल जवळ जागेच्या वादातून दगड आणि ब्लेडने केलेल्या मारहाणीत सुरज निजाम तलपदार (वय २८ रा.मोहोळ) हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जागेच्या वादातून त्याला संपत मोहोळकर आणि इतर चौघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## निलम नगरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : एमआयडीसी परिसरातील नीलमनगरात राहणाऱ्या बाललक्ष्मी लक्ष्मण दुर्गम (वय १८) या तरुणीने राहत्या घरात अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली . तिला उपचारासाठी गणेश दुर्गम (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. घरगुती वादातून तिने हा प्रकार केला. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जब भी देता है, छप्पर फाडके... !

कल्याण
488-07-179

मुंबई
579-14-220

# काँग्रेसने दंड थोपटताच माढ्याचा आखाडा तापला

**माढा/प्रतिनिधी**

**माढा विधानसभा मतदार संघात मोर्चेबांधणीला वेग आला आहे.विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांनी पुढील राजकीय भवितव्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर माढ्यातील काँग्रेस पक्षाकडून मैदानात उतरण्याची तयारी करण्यात आली. रविवारी झालेल्या मेळाव्यात काँग्रेसने दंड थोपटले.महाविकास आघाडीकडून यंदा माढ्याच्या नगराध्यक्षा अॅड.मिनलताई साठे यांना उमेदवारी द्यावी अन्यथा आमची चूल आम्ही वेगळी मांडू, असा इशारा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. त्यामुळे माढ्याचा राजकीय आखाडा तापत चालला आहे.**



**माढा : काँग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकीत मिनलताई साठे. व्यासपिठावर धनाजी साठे, दादासाहेब साठे आदी मान्यवर उपस्थित होते.**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार धनाजी साठे यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी माढ्यात काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. त्यात मिनलताई साठेंना महाविकास आघाडीकडून उमेदवारी देण्याची मागणी काँग्रेस कार्यकर्त्यांनी केली तसेच साठे परिवाराने विरोधकांवर टीकेचे आसूड ओढले.

आजपर्यंत महाविकास आघाडीकडून गरजेच्या वेळीच फक्त साठे कुटुंबाचा विचार केला जातो.

नुकतीच झालेली लोकसभेची निवडणूक असो वा इतर कोणतीही निवडणूक. साठे कुटुंबाने महाविकास आघाडीचे प्रामाणिकपणे काम केले आहे. माढा आणि करमाळा या दोन्ही मतदारसंघांमध्ये साठे गटाची निर्णायक ताकद असल्याने आगामी होणाऱ्या माढा विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीकडून अॅड मिनलताई साठे यांना संधी देण्यात यावी अन्यथा ही निवडणूक स्वबळावर लढवावी,असा नारा कार्यकर्त्यांनी दिला.

माढ्याच्या उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे,सचिन कापसे, सौरभ कदम, नवनाथ इंगळे, हरिभाऊ खताळ, बाळासाहेब पवार, सुनिल मोरे, राहुल पाटील, भाऊ वाघ, नारायण गायकवाड, अनिल काटे, विजयसिंह पाटील, बाबुराव मोहिते यांनी आपले विचार व्यक्त केले.

बैठकीसाठी कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक माढा नगरपंचायतीचे नगरसेवक नगरसेविका व माढा तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.प्रास्ताविक युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शाहुराजे जगताप तर सूत्रसंचालन समाधान लटके यांनी केले.

### आ.बबनदादांवर टीकास्त्र

श्री संत कूर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे यांनी आपल्या भाषणात आ.बबनदादा शिंदे यांच्यावर टीका केली. गेल्या तीस वर्षात आ. शिंदेंनी माढा विधानसभा मतदारसंघावर निर्विवाद सत्ता असतानाही विकासाचा फक्त भास निर्माण केला. आजही अनेक प्रश्न प्रलंबित असल्याने आमदारांनी तालुक्याचा कोणता विकास केला हा तालुक्यापुढचा प्रश्न आहे. ज्यांना सहकार्य केले, त्यांनीच साठे गट संपवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. असा आरोप त्यांनी केला.

### मिनलताईंचा विचार न केल्यास वेगळी 'चूल' मांडण्याचा इशारा

### आम्ही कार्यकर्त्यांसोबत

आपल्या अध्यक्षीय भाषणात अॅड धनाजी साठे म्हणाले की, जी इच्छा कार्यकर्त्याची तीच आमचीही आहे. जनतेच्या मनातील उमेदवार माढा तालुक्यातून विधानसभेत जायला हवा. यासाठी १५ ऑगस्टपासून जनसंवाद यात्रा काढून जनमताचा कौल घेतला जाणार आहे. जनमताचा कौल पाहून त्याचा आदर करीत पुढील राजकिय दिशा स्पष्ट केली जाईल.

### आम्हाला संपवण्याचे कारस्थान

माढ्यातील माजी आमदार धनाजीराव साठे यांचा गट संपवण्याचे कारस्थान प्रत्येकवेळेला झाले पण साठेंची ताकत संपलेली नाही. गेल्या अनेक वर्षापासून माढा विधानसभा मतदारसंघातील शिक्षण आरोग्य आणि रस्त्याच्या प्रश्नासह मूलभूत समस्या आजतागायत प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी आपण विधानसभा लढवणार असल्याचे काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवार तथा माढ्याच्या नगराध्यक्षा अॅड मिनलताई साठे यांनी या मेळाव्यात बोलताना सांगितले.